सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
डॉ. संतोष परचुरे
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२२–२३/२५१अ दिनांक : १६/१२/२०२२

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित

सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,

विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : रस्ते सुरक्षा जीवीत व वित्तहानी टाळण्यासाठीची उपाययोजना व नवीन सुधारीत धोरण ठरविणेबाबत....**
**संदर्भ : क्र.संकीर्ण–२०२२/प्र. क्र. २६९/विशि–३ दिनांक ०२ डिसेंबर, २०२२ चे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित दि. १७ ऑक्टोबर,२०२२ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तामधील मुद्दा क्र. १० यास अनुसरुन शाळा व कॉलेज मधील विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा तसेच वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी शाळा व कॉलेज मध्ये विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाचे कार्यक्रम नियमितपणे राबविण्यात यावेत. तसेच रस्ता सुरक्षेबाबत अभ्यासक्रमामध्ये समावेश करुन वर्गांमध्ये शिक्षण देण्यात यावे असे शासनामार्फत निर्देशित करण्यात आले आहे.

या संबंधीचे सविस्तर पत्र, आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमध्ये रस्ता सुरक्षा तसेच वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाचे कार्यक्रम नियमितपणे करण्यात यावेत. याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात यावे.

कळावे ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

डॉ. संतोष परचुरे
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक ४१८,**

**चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२**

**दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१** **Email ID:- vishi३-hted@mah.gov.in**


---

क्रमांक: क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र २६९/विशि-३ दिनांक:- ०२ डिसेंबर, २०२२

प्रति,

मा. कुलगुरू,

सर्व अकृषी विद्यापीठे/ स्वायत्त विद्यापीठे/ स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे/ समूह विद्यापीठे.

विषय :- राज्यातील रस्ते सुरक्षा जीवित व वित्तहानी टाळण्यासाठीची उपाययोजना व नवीन सुधारित धोरण ठरविणेबाबत...

संदर्भ :- कक्ष अधिकारी, गृह (परिवहन) विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक २३.११.२०२२ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित दि. १७ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. यातील मुद्दा क्र. १० शाळा व कॉलेज विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मध्ये रस्ता सुरक्षा तसेच वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी शाळा व कॉलेज विद्यार्थांच्या प्रशिक्षणाचे कार्यक्रम नियमितपणे करण्यात यावेत. तसेच रस्ता सुरक्षेबाबत अभ्यासक्रमामध्ये समावेश करून वर्गांमध्ये शिक्षण देण्यात यावे, असे निदेश दिले आहेत.

तरी, निदेशांच्या अनुषंगाने आपल्या स्तरावर आवश्यक कार्यवाही करण्यात यावी व अनुपालन अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

आपला,

(प्र. ना. ढवळे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत :- सहपत्र वरीलप्रमाणे

प्रत:-

१. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय.
३. संचालक, कला संचालनालय.
४. निवडनस्ती (विशि-३)

प्रथ
उ.व तं शिवि

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

गृह (परिवहन) विभाग,
२ दुसरा मजला (मुख्य इमारत) मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
०२२-२२०२९९५९
E-Mail: home__transport२@maharashtra.gov.in

क्र.एमव्हिआर-१०२२/प्र.क्र.१८१/परि-२

दिनांक: २३.११.२०२२

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. अपर मुख्य सचिव, नगर विकास-१, मंत्रालय, मुंबई-३२
५. अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. प्रधान सचिव, नगर विकास विभाग-२, मंत्रालय, मुंबई-३२
९. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
१०. महानगर आयुक्त-एमएमआरडीए, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व)
११. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२. सचिव, सार्वजनिक बांधकाम (रस्ते), मंत्रालय, मुंबई-३२
१३. सर्व विभागीय आयुक्त
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. व्यवस्थापकीय संचालक, एम.एस.आर.डी.सी.
१६. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१७. व्यवस्थापकीय, संचालक, एम.एस.आर.टी.सी
१८. सर्व विभागीय पोलीस महानिरीक्षक
१९. अप्पर पोलीस महासंचालक, वाहतूक
२०. सर्व पोलीस आयुक्त
२१. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
२२. सर्व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी
२३. सर्व मु.का.अ. नगरपरिषद (अ-वर्ग)
२४. नॅशनल हायवे प्राधिकरणचे संबंधित अधिकारी
२५. सर्व सह पोलीस आयुक्त-वाहतुक/परिवहन
२६. पोलीस उपआयुक्त-वाहतुक विभाग
२७. सर्व जिल्हयाचे मुख्य अभियंता-सा.बां.वि/राष्ट्रीय/महामार्ग/ एमएसआरडीसी / एमएमआरडीए/एनएचएआय
२८. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी

प्रधान सचिव
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. २८८०
दि. २८/११/२२

उ.स. (मोरे)
उपसचिव (शिक्षि)
उ.स. (शिक्षि)
प्रमोर्नी पहावे.
२८/११/२२
शिक्षि-३

विषय: रस्ते सुरक्षा जिवीत व वित्तहानी टाळण्यासाठीची उपाययोजना व नवीन सुधारीत धोरण ठरविणेबाबत बैठक.

संदर्भ : १) मा.मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी,मुख्यमंत्री सचिवालयाची दि.१२.१०.२०२२ रोजीची बैठकीची सूचना.

२) समक्रमांकाची दि.१४.१०.२०२२ रोजीची बैठकीची सूचना.

महोदय ,

उपरोक्त विषयाबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१७ ऑक्टोबर,२०२२ रोजी दुपारी ०२.००वा. सहयाद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठवित आहे.

आपला,

(भि. ओं. ठाकूर)
कक्ष अधिकारी, गृह (परिवहन) विभाग

सोबत:वरीलप्रमाणे
प्रत:

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव/विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव/विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री,सार्वजनिक बांधकाम(सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव(परिवहन) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक यांना माहितीस्तव अग्रेषित.
८. सह सचिव(परिवहन) यांचे स्वीय सहायक यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.
९. सह परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना इतिवृत्ताच्या अनुषंगाने कार्यवाही करावयाच्या निर्देशासह अग्रेषित.
१०. कक्ष अधिकारी,गृह विभाग, पोल-८ (गृह विभागाशी संबंधित सर्व अधिकारी यांना कळविणेबाबत व इतिवृत्तामधील मुद्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करावयाच्या निर्देशासह अग्रेषित)

विषय :- रस्ते सुरक्षा जिवीत व वित्तहानी टाळण्यासाठीची उपाययोजना व नवीन सुधारीत धोरण ठरविणेबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१७ ऑक्टोबर,२०२२ रोजी दुपारी ०२.००वा. सहयाद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. मनुकुमार श्रीवास्तव | मा.मुख्य सचिव |
| २ | श्री. मनोज सौनिक | अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम |
| ३ | श्री. अशिष कुमार सिंह | अपर मुख्य सचिव (परिवहन) |
| ४ | श्री. आनंद लिमये | अपर मुख्य सचिव (गृह) |
| ५ | श्री. संजय खंदारे | प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य |
| ६ | श्री. विकास रस्तोगी | प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण |
| ७ | श्री. खंडेराव पाटील | सचिव, ग्राम विकास विभाग |
| ८ | श्री. रणजित सिंह देओल | सचिव, शालेय शिक्षण विभाग |
| ८ | श्री. सदाशिव साळुंखे | सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ९ | श्री. एस.व्ही.आर. श्रीनिवास | महानगर आयुक्त, एमएमआरडीए |
| १० | श्री. राधेश्याम मोपलवार | उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ |
| ११ | श्री. शेखर चन्ने | उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ |
| १२ | श्री. विवेक भीमनवार | परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य |
| १३ | श्री. पी. वेलारासू | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका |
| १४ | श्री. रजनिश सेठ | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य |
| १५ | श्री. विवेक फणसळकर | पोलीस आयुक्त, मुंबई |
| १६ | श्री. कुलवंत सारंगल | अपर पोलीस महासंचालक, (वाहतुक) |
| १७ | श्री. संजय माहिते | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र |
| १८ | डॉ. महेंद्र कल्याणकर | जिल्हाधिकारी रायगड व विभागीय आयुक्त,को.वि. (अ.का.) |
| १९ | श्री. अशोक शिंगारे | जिल्हाधिकारी, ठाणे |
| २० | श्री. राजीव निवतकर | जिल्हाधिकारी, मुंबई शहर |
| २१ | श्री. बिपिन कुमार सिंह | पोलीस आयुक्त, नवी मुंबई |
| २२ | श्री. सदानंद दाते | पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्तालय |

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| २३ | श्री. अनुज जिंदल | मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. ठाणे |
| २४ | श्री. दतात्रय कराळे | पोलीस सह आयुक्त, ठाणे |
| २५ | श्री. राजवर्धन | सह पोलीस आयुक्त, (वाहतुक), मुंबई शहर |
| २६ | श्री. विक्रम देशमाने | पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण |
| २७ | श्रीमती. सुनिता ठाकरे | पोलीस अधिक्षक, महामार्ग पोलीस |
| २८ | श्री. पुरूषोत्तम कराड | पोलीस उपायुक्त, वाहतुक नवी मुंबई |
| २९ | श्री. रविंद्र गायकवाड | प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे |
| ३० | श्री. अशोक पवार | प्रादेशिक परिवहन अधिकारी (अ. का.), मुंबई (पश्चिम) |
| ३१ | श्री. विनय अहिरे | प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पुर्व) |
| ३२ | श्री. प्रकाश जाधव | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (मध्य) |
| ३३ | श्री. अनिल पाटील | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल |

सदर बैठकीत चर्चेअंती मा.मुख्यमंत्री महोदय यांनी सर्व विभागांचा आढावा घेऊन पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

| विषय क्रमांक | चर्चेचा मुद्दा व निर्णय | कार्यवाही करणारे कार्यालय / संबंधित विभाग |
|---|---|---|
| (१) | <u>जिल्हा / तालुका स्तरावरील समित्यांनी प्रभावीपणे कार्यवाही करणे</u><br>**अ)** जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या नियमीत बैठक घेण्याबाबत जिल्हाधिकारी यांना मा. मुख्य सचिव यांनी निर्देश दयावेत. | मा.मुख्य सचिव कार्यालय व परिवहन विभाग |
| | **ब)** अपघात कमी करण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हा / तालुका स्तरावरील सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून काम करावे व आवश्यक उपाययोजना कराव्यात. आवश्यक असल्यास NGO यांची मदत घेण्यात यावी. सर्व जिल्हांधिकाऱ्यांनी संबंधित विभागाची जबाबदारी निश्चित करुन त्याबाबत त्रैमासिक आढावा घेऊन जिल्हयातील अपघाताचे प्रमाण कमी करावे. | सर्व जिल्हाधिकारी व सर्व जिल्हा रस्ता सुरक्षा समिती. |
| (२) | <u>सर्व प्रमुख रस्त्यांवर वेग मर्यादा दर्शविणारे सूचना फलक लावण्यात यावेत.</u><br>एकाच रस्त्यांवर वेगवेगळया वेग मर्यादा असण्याची शक्यता असते. (उदा. सरळ/सपाट रस्त्यावर / घाट रस्त्यावर / बोगद्यामध्ये) त्यामुळे | सार्वजनिक बांधकाम विभाग / नगर विकास विभाग / राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) / महाराष्ट्र राज्य रस्ते विकास |

| | | |
|---|---|---|
| | वाहन चालकांना संबंधित रस्त्याची वेग मर्यादा समजण्यासाठी पुरेशा संख्येने व दर्शनीय ठिकाणी सूचना फलक लावण्यात यावेत. तसेच यासंदर्भात जिल्हा रस्ता सुरक्षा समिती व पोलीस विभागाने दर तीन महिन्यातून एकदा आढावा घ्यावा. | महामंडळ (MSRDC) / ग्राम विकास विभाग (RDD)/ महाराष्ट्र राज्य औदयोगिक विकास महामंडळ(MIDC) / एम.एम.आर.डी. ए. (MMRDA) / सर्व जिल्हा रस्ता सुरक्षा समिती. |
| (३) | <u>स्पीड डिटेक्शन कॅमेरा लावणे.</u><br>अ) ज्या रस्त्यांवर अतिवेगाने वाहने चालविली जातात अशी ठिकाणे निश्चित करुन त्याठिकाणी स्पीड डिटेक्शन कॅमेरा लावण्यात यावेत.<br><br>ब) वेग मर्यादेच्या अनुषंगाने वेगवेगळया रस्त्यांवर अचानक तपासणी करणे / विशेष मोहीम घेण्यात यावी | परिवहन विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग / नगर विकास विभाग/ राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI)/ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC)/ ग्राम विकास विभाग (RDD)/ महाराष्ट्र राज्य औदयोगिक विकास महामंडळ (MIDC)/एम.एम.आर.डी.ए. (MMRDA)<br>अपर पोलीस महासंचालक (वाहतुक)/ पोलीस विभाग (वाहतुक)/ परिवहन विभाग, सर्व पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधिक्षक, सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी |
| (५) | <u>iRAD App या प्रणालीची अंमलबजावणी करणेबाबत.</u><br>iRAD App या प्रणालीमधून अपघाताबाबत शास्त्रोक्त पध्दतीने अपघातांची नोंद केली जाते. सदर प्रणालीची अंमलबजावणी तात्काळ सर्व जिल्हयांमध्ये करुन घेण्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण देण्यात यावे, जेणेकरुन अपघाताविषयक शास्त्रोक्त माहिती उपलब्ध होवू शकेल व त्याअनुषंगाने अपघातांचे विश्लेषण करुन आवश्यक उपाययोजना करुन अपघातांचे प्रमाण कमी करता येईल. | अपर पोलीस महासंचालक (वाहतुक)/ पोलीस विभाग (वाहतुक)/ परिवहन विभाग / सर्व पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधिक्षक, सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी/ आरोग्य विभाग |
| (६) | <u>अंमलबजावणी करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे</u><br>मोटार वाहन कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या विभागातील पोलीस अधिकारी / कर्मचारी व परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना अपघात संदर्भात प्रशिक्षण देण्यात यावे. | अपर पोलीस महासंचालक (वाहतुक)/ पोलीस विभाग (वाहतुक)/ परिवहन विभाग / सर्व पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस |

| | | |
|---|---|---|
| | | अधिक्षक, सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी |
| (७) | इर्मजन्सी रिस्पॉन्स टाईम कमी करणे<br>अपघात झाल्यानंतर इतर जखमींना वेळेत वैद्यकीय मदत (गोल्डन अवर) मिळाल्यास त्यांचे प्राण वाचविणे शक्य होते.त्यामुळे अपघाती मृत्यूंचे प्रमाण कमी होणार असल्याने आरोग्य विभागाकडून पुरविण्यात येणाऱ्या ॲम्ब्युलन्स (Ambulance) यांचा इर्मजन्सी रिस्पॉन्स टाईम (Emergency response time) कमी करणे आवश्यक आहे. | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| (८) | ट्रॉमा केअर सेंटर कार्यन्वित करणे<br>राज्यातील प्रमुख रस्त्यांवर ट्रॉमा केअर सुविधा निर्माण करणे व त्यासाठी आवश्क असणारी उपकरणे त्याचबरोबर डॉक्टर्स, नर्सेस व आरोग्य कर्मचारी यांची नियुक्ती करावी. यासंदर्भात आरोग्य विभागाने त्यांचा कृती आराखडा संबंधीत जिल्हाधिकारी यांना सादर करावा. तसेच संबंधीत जिल्हा रस्ता सुरक्षा समितीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील ट्रामा केअर सेंटर्स योग्य रित्या कार्यान्वित राहतील यामध्ये लक्ष पुरवावे. | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| (९) | ऊस वाहतूक करणाऱ्या सर्व ट्रॅक्टर, ट्रेलर्स यांना रेट्रो रिफ्लेक्टीव्ह टेप बसविणे<br>ऊस व शेतमाल वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर, ट्रेलर्सना रिफ्लेक्टीव्ह टेप नसल्याने रस्ते अपघात झालेले आहेत. त्यामुळे अशी वाहतूक करणाऱ्या सर्व ट्रॅक्टर, ट्रेलर्स यांना रेट्रो रिफ्लेक्टीव्ह टेप (Retro Reflective Tape) साखर कारखान्यांमार्फत तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत विशेष मोहीम घेण्यात यावी. | साखर आयुक्त, पणन संचालक |
| (१०) | शाळा व कॉलेज विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षण<br>रस्ता सुरक्षा तसेच वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी शिक्षण विभागाने शाळा व कॉलेज विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाचे कार्यक्रम नियमितपणे करण्यात यावेत. तसेच रस्ता सुरक्षेबाबत अभ्यासक्रमामध्ये समावेश करुन वर्गांमध्ये शिक्षण देण्यात यावे. | शालेय शिक्षण विभाग,उच्च तंत्रशिक्षण विभाग. |

| | | |
|---|---|---|
| (११) | Empanelling crash investigation consultants<br>अपघातांचे तांत्रिक/शास्त्रीयदृष्ट्या विश्लेषण करण्यासाठी सल्लागार नेमण्यात यावे. | परिवहन आयुक्त |
| (१२) | नागरीक, विद्यार्थी व वाहन चालकांमध्ये रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती व्हावी म्हणून सर्व जिल्हा रस्ता सुरक्षा समिति व त्यांअंतर्गत सर्व संबंधित विभाग यांनी दर तीन महिन्यांतून एकदा रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करावा. यासाठी सेवाभावी संस्था, मोटार ट्रेनिंग स्कूल, वाहन वितरक, विद्यापीठ, महाविद्यालय, शाळा, साखर कारखाने, ट्रक असोसिएशन, बस असोसिएशन, रिक्षा असोसिएशन यांच्या सहकार्याने असे कार्यक्रम आयोजित करावेत. | सर्व जिल्हा रस्ता सुरक्षा समिती व सर्व संबंधित विभाग, पोलीस विभाग, परिवहन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, शालेय शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद |
| (१३) | <u>पुणे-मुंबई एक्सप्रेस मार्गावरुन अवजड वाहनचालक उजव्या बाजूने वाहन चालवत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने वाहनचालकां विरुद्ध कारवाई करण्याबाबत:-</u><br>पुणे- मुंबई एक्सप्रेस महामार्ग व राज्यातील इतर महामार्गांवर वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी तसेच पुणे – मुंबई एक्सप्रेस महामार्गावर लेन कटिंग करणाऱ्या अवजड वाहनांबाबत महामार्ग पोलीस विभागाने अवजड वाहनांचा दुचाकी वाहनांद्वारे पाठलाग करुन कारवाई करण्याबाबतची मोहीम राबवावी ,त्यास रस्त्याच्या बाजूस थांबवून लेन कटिंग व उजव्या बाजूने चालण्याच्या सवयीबाबत तसेच वाहतुक नियमांबाबत प्रबोधन करावे व वाहतुक नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांवर कडक कारवाई करण्यात यावी. | १)अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.<br>२)पोलीस अधिक्षक,राष्ट्रीय महामार्ग, पुणे<br>३) सर्व संबधीत पोलीस अधिक्षक |
| (१४) | <u>राज्यातील विविध मार्ग/ महामार्गावरील निश्चित केलेल्या ब्लॅक स्पॉटच्या ठिकाणी अपघात प्रतिबंधक आवश्यक उपाययोजना करण्याबाबत:-</u><br>विविध मार्ग/ महामार्गावर निश्चित केलेले ब्लॅक स्पॉट हे विना अपघात क्षेत्रात रूपांतरित करणेकरिता ते मार्ग/ महामार्ग ज्या विभागाच्या कार्यक्षेत्रात आहे त्या | १)सार्वजनिक बांधकाम विभाग<br>२)अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)<br>३)ग्रामविकास विभाग<br>४)सर्व पोलीस आयुक्त<br>५)सर्व पोलीस अधिक्षक<br>६)नगर विकास विभाग |

| | | |
|---|---|---|
| | संबंधित विभागाने त्या त्या ठिकाणी अपघात प्रतिबंधक आवश्यक उपाययोजना करण्यासंबंधी वेळोवेळी कार्यवाही करण्यात यावी. | ७)MSRDC |
| (१५) | <u>वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या वाहनांवर महाराष्ट्र वन स्टेट वन ई-चलन अंतर्गत करण्यात येणाऱ्या ई-चलन कारवाई व सदर चलन भरणा न करणाऱ्या वाहन चालकांवर कार्यवाही करण्याबाबत:-</u> ई चलन कारवाई झालेल्या वाहनचालकांमध्ये चलन भरणाऱ्या व न भरणाऱ्यांचा आढावा दर ६ महिन्यांनी घेण्यात यावा व ३-४ वेळा ई चलन कारवाई होऊनही चलन न भरणाऱ्या वाहनचालकांचे लायसन्स जमा / रद्द करण्याबाबत कारवाई करण्यात यावी. | १) परिवहन विभाग<br>२) अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)<br>३) सर्व पोलीस आयुक्त<br>४) सर्व पोलीस अधिक्षक<br>५) सर्व पोलीस आयुक्त. |
| (१६) | <u>अति महत्वाच्या व्यक्ती व इतर महत्वाच्या अत्यावश्यक सेवेतील घटकांना ई चलन कारवाईतून सूट मिळणेबाबत</u>:- अति महत्वाच्या व्यक्ती तसेच शासनाच्या अत्यावश्यक सेवेतील इतर घटकांच्या वाहनांकडून अनेक वेळा अत्यावश्यक परिस्थितीत वेग व इतर वाहतूक नियमांचे नकळत उल्लंघन होऊन प्रवास करत असतात, त्यावर स्वयंचलित प्रणालीद्वारे ई चलन कारवाई होते. अशा परीस्थितित कारवाई टाळण्यासाठी ई चलन कारवाईतून सूट असणाऱ्या व सूट नसणाऱ्या घटकांची वर्गवारी करुन उचित कारवाई करावी. | १) परिवहन विभाग<br>२) अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) |
| (१७) | **महाराष्ट्र वन स्टेट वन ई-चलन अंतर्गत दाखल प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यासाठी व्हर्च्युअल कोर्टाची आवश्यकता:-** राज्यात वन स्टेट वन ई-चलन अंतर्गत दाखल अदखलपात्र गुन्ह्याच्या प्रकरणांत झालेल्या वाढीमुळे नियमित न्यायालयात खटले मॅन्युअली सादर करणे खूप कठीण झाले आहे. याकरिता व्हर्च्युअल कोर्टाची आवश्यकता असून व्हर्च्युअल कोर्ट हे महाराष्ट्र वन स्टेट वन ई-चलन सोबत जोडण्यासाठी उच्च न्यायालयाकडून मान्यता मिळणे आवश्यक आहे. त्याकरिता विधी व | १) गृह विभाग<br>२) अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)<br>३) विधी व न्याय विभाग |

| | | |
|---|---|---|
| | न्याय विभागाशी समन्वय साधून पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी . | |
| (१८) | रस्ते सुरक्षा विषयक जनजागृती करण्याबाबत:- राज्यातील रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी रस्ता सुरक्षा सप्ताह व इतर जनजागृती विषयक आवश्यक कार्यक्रम राज्यभर वेळोवेळी आयोजित करण्यात यावेत. | १) परिवहन विभाग<br>२) अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)<br>३) सार्वजनिक बांधकाम विभाग<br>४) सर्व पोलीस आयुक्त<br>५) सर्व पोलीस अधिक्षक |
| (१९) | मुंबई वाहतूक विभागाच्या twitter हँडल वरून प्राप्त जनतेच्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत:- मुंबई वाहतूक विभागाच्या twitter हँडल वरून प्राप्त जनतेच्या तक्रारींची वाहतूक विभागाने वेळेत दखल घेऊन तात्काळ त्यासंबंधी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. | सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई |
| (२०) | जिल्हास्तरीय रस्ते सुरक्षा समितीचा नियमितपणे आढावा घेण्याबाबत:- जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा सुरक्षा समितीने संबंधित जिल्हयातील रस्ता सुरक्षा विषयक उपाययोजनांबाबत नियमितपणे आढावा बैठक घेऊन त्या त्या विभागास आवश्यक सुचना कराव्यात. | सर्व जिल्हाधिकारी |

*******